# संविधान दिन










प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com



इस्लामपूर : केबीपी महाविद्यालयात उपप्राचार्य प्रा. संतोष पाटील व प्रा. एस. के. खटावकर यांनी विद्यार्थ्यांना संविधानात्मक शपथ दिली.

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ज्युनिअर विभागात संविधान दिन

इस्लामपूर : येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या ज्युनिअर विभागातर्फे संविधान दिन साजरा करण्यात आला. उपप्राचार्य प्रा. संतोष पाटील अध्यक्षस्थानी होते. प्रा. एस. के. खटावकर यांनी विद्यार्थ्यांना संविधानाबाबत मार्गदर्शन केले. तसेच संविधानाची उद्देशपत्रिका वाचून विद्यार्थ्यांना प्रतिज्ञा व शपथ दिली. संयोजन प्रा. एच. बी. वसावे, प्रा. व्ही. एच. रासकर, प्रा. आर. एस जाधव, प्रा. के. आर ठाकरे, प्रा. जे. बी. चव्हाण यांनी केले. प्रा. डी. यू. चव्हाण - पाटील यांनी आभार मानले.

Sangli Edition
Dec 1, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

# इस्लामपुरात 'केबीपी'मध्ये संविधान प्रबोधन प्रश्नावलीद्वारे जागरूकता

इस्लामपूर : येथील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमध्ये भारतीय संविधान अमृतमहोत्सव वर्षानिमित्त संविधान पंधरवडा साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने संविधान प्रबोधन प्रश्नावलीद्वारे संविधानविषयक जागरूकता करण्याचा उपक्रम राबवण्यात आला. सुमारे ७०० च्या आसपास विद्यार्थी व प्राध्यापकांनी ही प्रश्नावली सोडवून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. या ऑनलाईन संविधान जागरूकता उपक्रमाचे महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील, उपाध्यक्ष सुनील पाटील, संस्थेच्या जनरल सचिव सरोज पाटील, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, उपप्राचार्य डॉ. पी. व्ही. गायकवाड, उपप्राचार्य संदीप पाटील, उपप्राचार्य संतोष पाटील, पर्यवेक्षक प्रा. मिलिंद खंडेलोटे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. या उपक्रमासाठी प्रा. एस. आर. गरुड, डॉ. एस. के. खडसे, डॉ. राजेश दांडगे यांनी परिश्रम घेतले.